कर भरा, राष्ट्र घडवा.

# महाराष्ट्र शासन
## वस्तू व सेवाकर विभाग
## विशेष राज्यकर आयुक्तांचे कार्यालय, माझगांव, मुंबई

ई-मेल आयडी --acest००5@gmail.com , दूरध्वनी क्रमांक - 022 23760390/0873/0392

**क्रमांक :स.रा.आ./आस्था-५/कर सहायक २०२३/पाचवा टप्पा/१६/नियुक्ती आदेश/ब-1305 मुंबई, दिनांक 18/12/2025**

# आदेश

संदर्भ:- :- १) आयोगाचे पत्र क्र.१४४२/गट-क संयुक्त क.स./२०२३/चोवीस दि. ११.०३.२०२५
२) शासनाचे पत्र क्र. विकवि ११२२/प्र.क्र.१३९/वि.प्र.-१ दि.१८.०३.२०२५
३) शासन अधिसुचना दि. २१.०६.२०२१

उपरोक्त संदर्भान्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने कर सहायक मुख्य परिक्षा-२०२३ च्या निकालाद्वारे ४६५ उमेदवारांची कर सहायक पदावरील सरळसेवेद्वारे नियुक्तीसाठी शिफारस केली आहे. त्यापैकी सोबतच्या परिशिष्टामधील स्तंभ क्र. ४ मधील उमेदवारांच्या, त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या कार्यालयात ते प्रत्यक्ष हजर झाल्याच्या दिनांकापासून, नामनिर्देशनाने, निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करण्यात येत आहे. सदर उमेदवाराला हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून **३०** दिवसाच्या आत नियुक्ती स्विकारणे अनिवार्य आहे. शिवाय प्रस्तुत नियुक्तीच्या संदर्भात त्यांनी वरील मुदतीत काहीही कळविले नाही, तर त्यांचे नाव कोणतीही पूर्वसूचना न देता निवड यादीवरुन काढून टाकण्यात येईल. सदर नियुक्त्या खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून करण्यात येत आहेत.

१. **ज्या उमेदवारांची नियुक्ती राखीव प्रवर्गातून झाली आहे त्यांच्या बाबतीत संबंधित आस्थापना अधिकाऱ्यांना आदेशित करण्यात येते की, शासन निर्णय क्र. बीसीसी २०११/प्र.क्र. १०६४/२०११/१६-ब दि.१२.१२.२०११ मधील तरतुदीनुसार उमेदवाराने नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत जातप्रमाणपत्राची वैधता संबंधित जात वैधता पडताळणी समितीकडून प्राप्त करुन घेवून आस्थापना कार्यालयामार्फत नियुक्ती प्राधिकाऱ्यास सादर करणे आवश्यक आहे. यास्तव सदर उमेदवारांकडून जातवैधता प्रमाणपत्र प्राप्त करुन या कार्यालयास सादर करणे बंधनकारक आहे.**

**उमेदवाराने सहा महिन्याच्या आत सदर जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास, उमेदवाराने सेवा प्रवेशासाठी दावा केलेला जातीचा दाखला चुकीचा आहे असे मानण्यात येईल व उमदेवारावर महाराष्ट्र अनुसुचित जाती, अनुसुचित जमाति, विमुक्त जाती, भटक्या जमाति, इतर मागासवर्ग व विशेष मागास**

**प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र व त्यांच्या पडताळणी विनियमन) अधिनियम, २००० यातील कलम दहा नुसार सेवा समाप्तीची पुढील कार्यवाही करण्यात येईल. यास्तव सदर आदेशातील उमेदवारांनी सहा महिन्याच्या आत सदर जातवैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास ते त्यांच्याकडे उपलब्ध नाही असे गृहित धरुन सहा महिन्यानंतर अशा उमेदवारांच्या सेवा समाप्ती बाबतचे प्रस्ताव शासन निर्णय दि. १०.०८.२००४ मधील तरतुदीस अनुसरुन संबंधित आस्थापना अधिकारी यांनी मागासवर्ग कक्ष, आस्थापना-८ यांच्या कार्यालयामार्फत नियुक्ती प्राधिकारी तथा मा. विशेष राज्यकर आयुक्त यांच्या कार्यालयाकडे पाठविणे बंधनकारक आहे. अशा उमेदवारांचे सेवा समाप्तीचे आदेश तात्काळ निर्गमित करण्यात येतील. संबंधित प्रकरणी सेवा समाप्तीचे प्रस्ताव पाठविण्यात हलगर्जीपणा आढळल्यास आस्थापना अधिकाऱ्यावर कठोर कार्यवाही करण्यात येईल.**

२. अ) या कर सहायकांचे सुधारित वेतन मॅट्रिक्समधील वेतनस्तर S-८(२५५००-८११००), मूळ वेतन: - २५५०० असे राहील.

ब) या वेतन बँड व्यतीरिक्त शासन वेळोवेळी ठरवील त्या दराने महागाई भत्ता, घरभाडे भत्ता व स्थानिक पूरक भत्ता इ. अनुज्ञेय राहील.

३. कर सहायक पदावरील नियुक्ती **वैद्यकीय तपासणीच्या व पोलीस पडताळणीच्या अधीन राहून** करण्यात येत आहे. पदावर रुजू होताच सदर उमेदवारास तात्काळ वैद्यकीय तपासणीसाठी पाठविण्यात येईल. सक्षम वैद्यकीय प्राधिकाऱ्याने वैद्यकीय दृष्टया कर सहायक पदासाठी जर उमेदवारास अयोग्य ठरविले तर, सदर उमेदवारांची नियुक्ती संपुष्टात आणण्याचे अधिकार वस्तू व सेवाकर विभागाने राखून ठेवले आहेत आणि त्या प्रसंगी सदर उमेदवार रुजू झाल्याच्या दिनांकापासून नेमणूक संपुष्टात आणण्याच्या दिनांकापर्यंत सदर उमेदवारास दिली गेलेली वेतनाची रक्कम विभागास परत घेण्याचा अथवा वेतनाची देय असलेली रक्कम वस्तू व सेवाकर विभागाकडे राखून ठेवण्याचा हक्क विभागास असेल.

४. कर सहायक पदावर शिफारस झाल्यामुळे रुजू होण्यासाठी हजर राहते वेळी संबंधीत उमेदवाराला परिशिष्ट-ब मधील हमीपत्र सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा, उमेदवारास कर सहायक पदावर हजर करुन घेण्यात येणार नाही. तसे सदर हमीपत्र समाधानकारक नसल्यामुळे स्विकारार्ह नसेल तर उमेदवारास हमीपत्र पुन्हा सादर करावे लागेल.

५. कर सहायक या पदावर नियुक्ती केलेल्या व्यक्तीस कर सहायकांसाठी विहित केलेली विभागीय परिक्षा, त्या संबंधी केलेल्या नियमातील तरतूदीनुसार उत्तीर्ण होण्यातून त्याला/तिला सुट मिळाली नसल्यास सदर परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

६. कर सहायक पदावर नियुक्ती झालेल्या व्यक्तीस जर तो/ती अगोदरच उत्तीर्ण झाली नसेल किंवा परिक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर त्याला/तिला हिंदी व मराठी भाषा परिक्षा त्यासंबंधी केलेल्या नियमानुसार उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. विहित मुदतीत परिक्षा उत्तीर्ण न झाल्यास कर सहायक या पदावरील सेवा कोणतीही पूर्वसुचना न देता समाप्त करण्यात येईल.

७. कर सहायक पदावर नियुक्ती झालेल्या व्यक्तीने महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचनालयाने वेळोवेळी विहित केलेल्या संगणक हाताळणीचे प्रमाणपत्र, शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्र.प्रशिक्षण२०००/प्र.क्र.६१/२००१/३९ दिनांक १९.०३.२००३ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र राज्य, उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई, अधिकृत MS-CIT परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र नियुक्ती स्विकारण्याच्या वेळेस

सादर करणे आवश्यक राहील. तथापि, नियुक्ती स्विकारण्याच्या वेळी उमेदवारांकडे सदर प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास नियुक्ती स्विकारल्यापासून २ वर्षांच्या आत संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील. या कालावधीत सदर प्रमाणपत्र सादर न करणाऱ्या उमेदवाराची सेवा कोणतीही पूर्वसुचना न देता तात्काळ समाप्त करण्यात येईल.

८. महिलांसाठी आरक्षित पदावर शिफारस झालेल्या महिला उमेदवारांबाबत शासन निर्णय दि.२५/०५/२००१ व १०/०४/२०१७ मधील सुचनेनुसार कार्यवाही करण्यात येईल.

९. खेळाडू पदावर शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांची शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दि.०१ जुलै २०१६, दि.१८/०८/२०१६, ११/०३/२०१९ व २४/१०/२०१९ च्या शुध्दीपत्रकामधील सूचना लागु असतील.

१०. अपंगासाठी राखीव पदावर शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांची शासन निर्णय सा.प्र.वि.अपंग १००३/प्र.क्र. १२७/२००३/१६-अ, दि. ६ मे २००४ मधील सुचनेनुसार कार्यवाही करण्यात येईल. तसेच विकलांग व्यक्तीसाठी असलेल्या वयोमर्यादेचा फायदा घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक अप्रकि-२०१२/प्र.क्र.२९७/आरोग्य-६ दिनांक ०६/१०/२०१२ व १४/०९/२०१८ मधील सूचना लागु असतील.

११. तसेच ज्या मूळच्या राखीव प्रवर्गातील उमेदवारांची शिफारस खुल्या प्रवर्गातून झालेली आहे परंतू अशा उमेदवारांनी परिक्षेस अर्ज दाखल करताना राखीव प्रवर्गासाठीचा दावा केला असेल, अशा उमेदवारांना भविष्यात मुळ जात प्रवर्गाचे लाभ घ्यावयाचे असल्यास जात वैधता प्रमाणपत्र, नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून ६ महिन्याच्या आत सादर करण्याच्या अटीच्या अधीन राहून नियुक्ती देण्यात येत आहे. याबाबत उमेदवाराने विभागाने विहित केलेले हमीपत्र (परिशिष्ट-ब) नियुक्ती स्विकारते वेळी सादर करणे बंधनकारक आहे.

१२. ज्या उमेदवारांनी माजी सैनिक आरक्षणाचा दावा केला आहे अशा उमेदवारांच्याबाबत सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, दि.०२.०९.१९८३ मधील तरतुदींनुसार कार्यवाही करण्यात येईल. सदर शासन निर्णय विचारात घेवून माजी सैनिक वर्गवारीचा दावा तपासण्याच्या अधिन राहून शिफारसपात्र उमेदवारांची अर्हता व पात्रतेची पूर्तता होत असेल तरच त्यांना नियुक्ती देण्यात येईल. कर सहायक पदावर नियुक्ती झालेल्या माजी सैनिक उमेदवाराने सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र.१८०/२८, दिनांक १३ जून २०१९, मधील तरतुदीनुसार टंकलेखनाची (इंग्रजी/मराठी) परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र नियुक्ती स्विकारण्याच्या वेळेस सादर करणे आवश्यक राहील. तथापि, नियुक्ती स्विकारण्याच्या वेळी उमेदवारांकडे सदर प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास नियुक्ती स्विकारल्याच्या दिनांकापासून २ वर्षांच्या आत टंकलेखन अर्हतेचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील. या कालावधीत सदर प्रमाणपत्र सादर न करणाऱ्या उमेदवाराची सेवा कोणतीही पूर्वसुचना न देता तात्काळ समाप्त करण्यात येईल.

१३. **कर सहायक परिक्षा-२०२३ साठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने घेतलेल्या परिक्षेकरिता online अर्ज मागविण्यात आले होते. त्यानुसार आयोगाने सर्व उमेदवारांची शिफारस त्यांनी त्यांच्या आवेदन पत्रात केलेल्या दाव्यानुसार केली असून या उमेदवारांच्या जन्मतारखा, शैक्षणिक पात्रता, मागासवर्गीय किंवा शारिरिक अपंगतत्वाबाबतचे दावे आयोगाने उमेदवारांच्या मूळ प्रमाणपत्रावरुन तपासले नसल्याने उमेदवारांना कुठल्याही टप्प्यावर अर्जातील दावे चूकीचे आढळून आल्यास ते नियुक्तीसाठी अपात्र ठरतील,**

**कृपया याची नोंद घेण्यात यावी. आपण आयोगाला केलेल्या अर्जातील दाव्याच्या तपासणीसाठी आवश्यक व योग्य ती प्रमाणपत्रे आपण नियुक्ती प्राधिकाऱ्यांना सादर करु शकला नाहीत तर, आपली शिफारस आपोआप रद्द समजण्यात येईल व तसे आयोगाला कळविण्यात येईल.**

१४. या कर सहायकांना वित्त विभाग, शासन निर्णय क्र.अंनियो१००५/१२६/सेवा-४ दि. ३१.१०.२००५ नुसार नवीन "परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना" लागू होईल. सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना (म्हणजेच महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम, १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशिकरण) नियम १९८४) आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी योजना लागू होणार नाही.

१५. **कर सहायक पदावरील नियुक्ती स्विकारण्यापूर्वी एखादा उमेदवार अन्य कोणत्याही शासकीय/निमशासकीय/इतर कार्यालयात नोकरीत असेल तर त्यांना त्या नोकरीचा राजीनामा किंवा कार्यमुक्ती आदेश नियुक्ती स्विकारते वेळी सादर करावा लागेल. अन्यथा सदर उमेदवारास कर सहायक पदावर हजर करुन घेण्यात येणार नाही.**

१६. खालील अटी पूर्ण न करणारे कर सहायक यांची सेवा कोणतीही पूर्वसुचना न देता तात्काळ समाप्त करण्यात येईल.

अ) ज्यांची वर्तवणूक असमाधानकारक अथवा पदास शोभेशी आढळून आली/येणार नाही.

ब) जे विभागीय परिक्षा किंवा प्रशिक्षण परिक्षा विहित कालावधीत/संधीत उत्तीर्ण झाले/ होणार नाहीत.

१७. कर सहायक या पदावर नियुक्ती केलेली व्यक्ती महाराष्ट्र राज्यात कोठेही बदली होणेस पात्र राहील.

१८. या कर सहायकांची ज्येष्ठता महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठता) नियम, २०२१ नुसार निश्चित करण्यात येईल. एकूण उमेदवारांपैकी आयोगाच्या सूचनांप्रमाणे नियुक्ती पूर्वी उमेदवारांच्या प्रमाणपत्रांची पडताळणी आवश्यक असल्याने, प्रशासकीय कारणांस्तव जरी टप्प्या-टप्प्याने म्हणजेच ज्या क्रमाने पडताळणी अहवाल प्राप्त होतील त्याक्रमाने उमेदवारांना नियुक्ती देण्यात आली तरी सदर उमेदवारांची सेवाज्येष्ठता महाराष्ट्र नागरी सेवा,(सेवाज्येष्ठतेचे विनियमन)नियम, २०२१ मधील तरतूदींनुसार निश्चित करण्यात येईल म्हणजेच नियुक्ती आदेश निर्गमित केल्यानंतर विहित कालावधीत नियुक्ती स्विकारणाऱ्या उमेदवारांची ज्येष्ठता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या ०५.०३.२०२५ च्या शिफारस पत्रातील गुणवत्ता क्र नुसार राहिल.

१९. जर उमेदवार शासन सेवेतील कर सहायक या पदावरील नेमणूकीसाठी सदर पदाच्या सेवा प्रवेश नियमातील तरतुदीप्रमाणे पात्र नव्हता अथवा विहित अर्हता प्राप्त नव्हता अथवा त्यांनी नेमणूक मिळविण्यासाठी खोटी माहिती दिली होती अथवा खोटे प्रमाणपत्र सादर केले होते, असे नंतर आढळून आले, तर अशा उमेदवाऱ्यांच्या सेवा सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.सीडीआर-१०९३/१०७७/प्र.क्र.२३/९३ अकरा, दि. १२/१०/१९९३ मधील तरतूदीनुसार समाप्त करण्यात येतील.

२०. सदर कर सहायकाला नियुक्तीच्या ठिकाणी उपस्थित राहण्यासाठी प्रवास भत्ता देय असणार नाही.

२१. सदर नियुक्ती शासनाच्या वेळोवेळी पारित होणाऱ्या निर्णयाच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

२२. **सदर आदेश www.mahagअ.ज..gov.in या संकेत स्थळावर whatsnew सदराखाली उपलब्ध आहे. हे आदेश निर्गमित होताच उमेदवाराने मूळ कागदपत्रांसह सहाय्यक राज्यकर आयुक्त, आस्थापना-५, तिसरा मजला, वस्तू व सेवाकर भवन, माझगांव, मुंबई या कार्यालयात विहीत मुदतीत (३० दिवसांत) हजर व्हावे.**

**विहित मुदतीमध्ये हजर न झाल्यास सामान्य प्रशासन विभागाच्या शा. नि. दि. २८/०५/२०१८ व दि.२६/०९/२०१८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.**

२३. पडताळणीनंतर त्यांना कर सहायक पदावर मुंबई कार्यालयात रुजू करुन घेतले जाईल. तद्नंतर उमेदवारांनी सोबतच्या परिशिष्ट-अ मध्ये त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या स्तंभ क्र.४ मधील कार्यालयात त्वरीत हजर होणे आवश्यक आहे. संबंधीत क्षेत्रीय अपर राज्यकर आयुक्त/राज्यकर सहआयुक्त,(प्रशा) यांनी त्यांच्या आस्थापनेवर नियुक्ती दर्शविलेल्या कार्यशाखानिहाय नियुक्ती द्यावी आणि संबंधीत कार्यालयीन नियुक्ती आदेशाची प्रत सहाय्यक राज्यकर आयुक्त, आस्थापना-५, महाराष्ट्र राज्य, मुंबई या कार्यालयात सादर करावी.

२४. **आदेशातील नमुद उमेदवारांनी नेमणुक देतांना किंवा त्यानंतर विशिष्ट ठिकाणी नियुक्ती देण्याकरीता राजकीय किंवा इतर कोणत्याही प्रकारचा प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष दबाव आणल्यास सदर उमेदवाराविरुद्ध महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९८१ मधील तरतुदीनुसार शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल.**

**(मा. विशेष राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मान्यतेने).**

(संजय निकम)
**राज्यकर सहआयुक्त (मुख्यालय-४)**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

सहपत्रे -परिशिष्ट -अ व ब

प्रत सादर :-

१. मा.अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. मा. राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३. संबंधीत अपर राज्यकर आयुक्त
४. राज्यकर सहायक आयुक्त, मागासवर्ग कक्ष, आस्थापना-८, वस्तु व सेवाकर विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
५. संबंधित उमेदवार
६. स्थळप्रत

परिशिष्ट-अ

क्रमांक : स.रा.आ./आस्था-५/कर सहायक २०२३/पाचवा टप्पा/१६/नियुक्ती आदेश/ब- 1305 मुंबई, दिनांक:- 18/12/2025

| अ.क्र. | गुणवत्ता क्र. | उमेदवाराचे नाव | उमेदवाराचा मुळ प्रवर्ग | उमेदवाराचा निवडीचा प्रवर्ग | पदस्थापनेचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | ११२ | खान हिदायातुल्ला खान इनायतुल्ला | आ.दु.घ | आ.दु.घ- सर्वसाधारण -२ | राज्यकर आयुक्त कार्यालय, माझगांव, मुंबई |
| २ | ११७ | अमृत अण्णासो पिंगळे | भ.ज.क. | भ.ज.क.- सर्वसाधारण -२ | अपर राज्यकर आयुक्त, झोन-१, माझगांव, मुंबई |
| ३ | ११८ | राहुल संजय पाटील | इ.मा.व | इ.मा.व.-सर्वसाधारण -१ | अपर राज्यकर आयुक्त, झोन-२, माझगांव, मुंबई |
| ४ | १२१ | राहुल राजेद्रं जाधव | इ.मा.व | इ.मा.व.-सर्वसाधारण -२ | अपर राज्यकर आयुक्त, झोन-३, माझगांव, मुंबइ |
| ५ | १३० | महेश रमेश काकड | इ.मा.व | इ.मा.व.-सर्वसाधारण -४ | विशेष राज्यकर आयुक्त कार्यालय, माझगांव, मुंबई |
| ६ | १३४ | सुनिल केसरसिंग गुसिंगे | वि.जा.अ. | वि.जा.अ.- सर्वसाधारण -१ | अपर राज्यकर आयुक्त, झोन-४, माझगांव, मुंबई |
| ७ | १५२ | अंकित रामचंद्र धनवटे | वि.जा.अ. | वि.जा.अ.- सर्वसाधारण -२ | अपर राज्यकर आयुक्त, झोन-५, माझगांव, मुंबई |
| ८ | १६१ | दिगबंर महादेव धनके | आ.दु.घ | आ.दु.घ- सर्वसाधारण -२२ | अपर राज्यकर आयुक्त, झोन-१, माझगांव, मुंबई |
| ९ | १६२ | रामदास गणपत कदम | आ.दु.घ | आ.दु.घ- सर्वसाधारण -२३ | विशेष राज्यकर आयुक्त कार्यालय, माझगांव, मुंबई |
| १० | १९० | विशाल रामदास सिनलकर | इ.मा.व | इ.मा.व.-सर्वसाधारण -२२ | अपर राज्यकर आयुक्त, झोन-२, माझगांव, मुंबई |
| ११ | २०२ | निखिल रावसाहेब धोंडे | इ.मा.व | इ.मा.व.-सर्वसाधारण -३० | अपर राज्यकर आयुक्त, झोन-३, माझगांव, मुंबई |
| १२ | २३६ | अर्चित श्रीहरी मकोटे | वि.मा.प्र | वि.मा.प्र- सर्वसाधारण -४ | अपर राज्यकर आयुक्त, झोन-४, माझगांव, मुंबई |
| १३ | २५९ | तृप्ती प्रमोद खांदवे | भ.ज.क. | भ.ज.क.-महिला-१ | अपर राज्यकर आयुक्त, झोन-५, माझगांव, मुंबई |
| १४ | २९७ | पुजा शंकर काटकर | आ.दु.घ | आ.दु.घ-महिला-१४ | राज्यकर आयुक्त कार्यालय, माझगांव, मुंबई |
| १५ | ३३१ | समिक्षा रामेश्वर निलखन | इ.मा.व | इ.मा.व -महिला-२४ | अपर राज्यकर आयुक्त, झोन-१, माझगांव, मुंबई |
| १६ | ४०२ | रविंद्र जानकिराम काळे | इ.मा.व | दिव्यांग-ID/MD-३ | अपर राज्यकर आयुक्त यांचे कार्यालय,छत्रपती संभाजीनगर |

**(मा. विशेष राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मान्यतेने),**

(संजय निकम)
**राज्यकर सहआयुक्त (मुख्यालय-४)**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

<u>परिशिष्ट -ब</u>

<u>हमीपत्र</u>

मी श्री/श्रीमती/कु.------------------------------------------------ घोषित करतो /करते की, कर सहायक परिक्षा-२०२३ चे आवेदनपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास सादर करतेवेळी दिलेली माहिती व राज्यकर विभागास कागदपत्रे पडताळणी दरम्यान सादर केलेली कागदपत्रे यामध्ये तफावत आढळल्यास माझी कर सहायक पदावरील नेमणुक कोणत्याही टप्प्यावर रद्द केल्यास काहीही हरकत असणार नाही. तसेच राज्यकर विभाग व महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांचेकडुन करण्यात येणाऱ्या कायदेशीर कार्यवाहीस मी पात्र राहीन याची मला जाणीव आहे.

ठिकाण:-

दिनांक :- उमेदवाराचे संपूर्ण नाव

व स्वाक्षरी

<u>हमीपत्र</u>

मी श्री/श्रीमती/कु.------------------------------------------------------------------घोषित करतो/करते की, माझी कर सहायक या पदी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने घेतलेल्या कर सहायक परिक्षा -२०२३ मधून निवड झाली आहे. माझी नेमणूक राज्यकर विभागाने वैद्यकिय चाचणी व पोलीस पडताळणीच्या अधिन राहून केलेली आहे. हे मला माहित व मान्य आहे. जर पोलीस पडताळणी व वैद्यकिय चाचणीच्या अहवालामध्ये विसंगती आढळल्यास माझी नेमणूक रद्द होईल याची मला जाणीव आहे. तशी पूर्व सूचना मला मिळाली आहे. तसेच राज्यकर विभागातील नियुक्ती मिळण्यासंबंधातील कोणतेही फायदे घेण्यास मी पात्र राहणार नाही.

ठिकाण:-

दिनांक :- उमेदवाराचे संपूर्ण नाव

व स्वाक्षरी

<u>हमीपत्र</u>

मी श्री/श्रीमती/कु.------------------------------------------------------------------घोषित करतो /करते की, संबंधित विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती यांच्याकडून माझा अजा/विजा अ/भज ब क ड/विमाप्र/इमाव चे प्रमाणपत्र (शा.नि. दि. ०५.०३.२००५ अन्वये) अवैध/चूकीचे ठरले तर या विभागातील नियुक्ती मिळण्यासंबंधातील कोणतेही फायदे घेण्यास मी पात्र राहणार नाही. सदर प्रमाणपत्र अवैध/चूकीचे ठरल्यास माझी राज्यकर विभागातील नेमणूक रद्द होईल याची मला जाणीव आहे व याबाबत माझी कसलीही तक्रार राहणार नाही.

ठिकाण:-

दिनांक :- उमेदवाराचे संपूर्ण नाव व स्वाक्षर

उमेदवाराचा रुजु अहवाल

नियुक्ती दिलेल्या उमेदवाराने त्यास नियुक्ती दिलेल्या कार्यालयात रुजु झाल्याबाबतचा अहवाल

उमेदवाराचे नांव व भ्रमणध्वनी क्रमांक
महाराष्ट्र लोकसेवा आयोग गुणवत्ता यादी क्र.
उमेदवाराच्या निवडीचा प्रवर्ग
उमेदवाराचा स्वत:चा मुळ प्रवर्ग

प्रति,
मा. सहायक राज्यकर आयुक्त
आस्था-५, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३ रा मजला, एच विंग, राज्यकर भवन
माझगांव, मुंबई ४०० ०१०.

महोदय,

मी खाली सही करणार श्री./श्रीम./कु. -------------------------------------------- नमुद करतो/करते की, आपले आदेश -------------------------------------------------------------------------------------------- दि. ........................रोजीचे पत्र मला मिळाले. त्यानुसार मी ---------------------------------------------- या विभाग/कार्यालयात कर सहायक या पदावर दिनांक --------------- रोजी रुजु झालो/झाले आहे. हे आपणांस माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी कळविण्यात येत आहे.

आपला/आपली,

उमेदवाराचे नांव व सही

उमेदवारास नियुक्ती दिलेल्या कार्यालयाचे अभिवेदन*(खालील तळटीप पहावी)

कळविण्यात येते की,श्री./श्रीम./कुमा.--------------------------------------- गुणवत्ता यादी क्र. -------- हे उमेदवार दि. --------------- रोजी कर सहायक या पदावर रुजु झालेले आहेत. संबंधीत उमेदवारांच्या ओळखपत्राची पडताळणी करण्यात आलेली असुन त्यांना कर सहायक या पदावर हजर करुन घेण्यात आलेले आहे.

आस्थापना अधिकाऱ्यांची स्वाक्षरी व शिक्का

तळटीप:- १. उमेदवाराने नियुक्ती दिलेल्या विभाग/कार्यालयात रुजु झाल्यानंतर वरील पत्र तात्काळ या विभागास सादर करावे अन्यथा त्यांना दिलेली नियुक्ती त्यांनी स्वीकारली नाही अस समजुन योग्य ती पुढील कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.